**साक्षीदार क्र.१ यांच्या शपथेवर पुढील सरतपास सरकारतर्फे अभियोक्ता श्री.ए.एस. कदम यांचेद्वारे शपथेवर सुरुः–**

आरोपी यांने मला डाव्या हाताच्या मनगटावर बाहेर बाजूस जखम केलेली होती. त्यांनी तसेच माझ्या डोक्यावर डाव्याबाजूस तसेच उजव्या पायाच्या गुडघ्याच्या वरी जखम केली होती. आरोपीकडे टरबुज कापायची सुरी होती त्यांने मला जखमी केली होती. आज आरोपी कोर्टापुढे आरोपी उपस्थीत नाहीत जर उपस्थीत असले तर मी त्यांना ओळखू शकतो. मी पोलिसांकडे परत तपासकामी गेलो नाही.

**साक्षीदार क्र.१ चा उलटतपास आरोपी तर्फे श्री.एन.एन.पटेल विधीज्ञ यांचेद्वारे शपथेवर सुरुः–**

हे म्हणणे बरोबर आहे की, मुस्लीम धर्मीयांमध्ये विवाह जो प्रसंग मुलीच्या घरी होतो त्या प्रसंगाने वलमी मुलाच्या घरी होतो आणि लग्न उचलून घेतले तर लग्नाचा समारंभ मुलाकडे होतो. गफारच्या पत्नीचे माहेर कुठले आहे ते मला माहिती नाही. गफारचे लग्न २०१५ साली झाले होते मी नक्की तारीख वार सांगू शकत नाही. उदगीर येथे बरेच शादीखाणे आहेत. उदगीर येथे बरेच लग्न प्रसंग हे शादी खाण्यामध्ये होतात तसेच वलीमा पण

तिथेच होतात. मुसानगर येथे आमच्या कुटुंबाकडे मुतावली आहे. अफारोज हेचे वडील फैजू खान हे मुसा नगर येथील नगर सेवक होते. ते तीन वेळा नगर सेवक म्हणून निवडून आलेले होते.

ईसा जाहगीरदार माझे चाचा होय. ईसा जाहगीरदार आणि फैजू खान हे निवडणुकामध्ये एकमेकांचे विरोधक असे. हे म्हणणे खरे नाही की, तिन्ही निवडणूका मध्ये तिन वेळा फैजू खान ने ईसा जाहगीरदार यांना हारवले होते. माझ्या मते एकदाच फैजू खानने ईसा जाहगीरदार यांना निवडणूकीत हरवले होते. २०१३ साली ईसा जाहगीरदार, माझा भाउ असलम, मुकरम, अकरम, आयाज, रियाज व जाहगीरदार यांच्या वर भा.द.वि ३०७ प्रमाणे अपराध दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, फैजू खान व कुटुंबीयाशी वाद असल्यामुळे अफरोज विरुध्द खोटी केस केली आहे.

पोलिसांनी माझा जबाब ठाण्यात घेतला होता. ईसा जाहगीरदार माझा जबाब झाल्यानंतर तिथे आले. मुकरम जाहगीरदार हे जबाब देते वेळेस माझ्या सोबत होते. मुकरम हे नगरसेवक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी माझ्या मित्राचे लग्न होते मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांनी मला चाकूने मारले हे मी खोटे सांगत आहे. मला मराठी लिहता वाचता येत नाही. माझी फिर्याद नोंदविलेली ती मला वाचून

दाखविली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला फसविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. आरोपी यांनी मला टरबुजाच्या चाकू दुखापत केली मी हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

फेर तपास नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.01.01 16:37:24 +0530

**दिनांक – ०१/०१/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्र.व.**
**उदगीर.** **(न्यायालय क्रं. १), उदगीर.**

**दाखला**

साक्षीदार यांची साक्ष ही हिंदी भाषेत घेण्यात आली. तिचा अनुवाद करुन मराठीत नोंदवून घेण्यात आला. साक्षीदार यांना जबाब हिंदी सांगितला व तो मराठीत नोंदवून घेतला व तो त्यांच्या सांगण्याप्रमाणे असल्याचे हिंदीत अनुवादीत करुन सांगण्यात आले म्हणून सदर दाखला.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.01.01 16:37:31 +0530

**दिनांक – ०१/०१/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्र.व.**
**उदगीर.** **(न्यायालय क्रं. १), उदगीर.**